**Airoli katai naka project achieved Milestone**

**MMRDA launched 16 PSC I girders on Thane Belapur road**

**Last Girder of Airoli side in the phase -I of Airoli-Katai Naka Project launched yesterday night**

**Mumbai, 31 March, 2023:**

Team MMRDA completed girder launching activity yesterday at Airoli side in the phase-1 of Airoli-Katai Naka project with the erection of last PSC I girder. Total 16 PSC-I girders were launched across Thane Belapur Road near Bharat Bijlee Junction Airoli. These girders are 23 to 27 m long and each girder having weight of 48 Metric Ton were launched with the help of two cranes of capacity 250 MT each. Two Traffic blocks was taken to complete this activity. The first block was on 25th & 26th March and second one on 29th & 30th Mrach between 10:30 pm to 6:00 am. This was the last girder erection activity in the phase-I of this project at Airoli side.

MMRDA is constructing 12.3 kms Airoli-Katai Naka Road Project to facilitate seamless smooth traffic between Kalyan-Dombivli and Navi Mumbai. The Airoli-Katai Naka Project is starts from Mulund-Airoli Bridge and extending up to Katai Naka on the Kalyan-Shil Road through the Thane-Belapur Road and the National Highway No. 4. This project will provide an alternative route for vehicles and ease traffic congestion between these two locations.

The 12.3-km project is divided into three Phases. The first Phase includes construction of a 3.43-km road between the Thane-Belapur Road and the National Highway No. 4 (Old Mumbai Pune Highway) . In this phase there is a 1.69 km long Twin Tunnel of 3+3 lanes with 1+1 refuse lane and the rest will be elevated and normal road. The work of Eleveted portion in these phase is now 92% completed as well as 66% of tunnel work has been completed. In the second Phase a 2.57-km, fully-elevated road will connect Mulund-Airoli Bridge to the Thane-Belapur Road. The work in this section has been completed up to about 67.5 percent & The Third phase of the project is having a 6.30 km fully-elevated road, connecting the National Highway No. 4 to Katai Naka at Kalyan-Shil Road.

**“Team MMRDA achieved significant milestone in Airoli-Katai Naka project by launching last PSC I Girder in phase-I, this was last activity of Launching of Girder at Airoli side. Now this phase will connects with Phase-II which is an fully elevated road. Deck slab, ACB, wearing coat, painting activity in phase-I is in progress and now the phase-I is verge of completion"** said Shri S.V.R. Srinivas, IAS, Hon Metropolitan Commisioner MMRDA.

**ऐरोली काटई नाका प्रकल्पाने गाठला महत्त्वाचा टप्पा**

**एमएमआरडीएने ठाणे बेलापूर रस्त्यावर १६ पीएससी आय गर्डर्स लाँच केले**

**ऐरोली-काटई नाका प्रकल्पाच्या पहिल्या भागातील ऐरोली बाजूचा शेवटचा गर्डर झाला लाँच**

**मुंबई, ३१ मार्च २०२३:**

एमएमआरडीएच्या टीमने काल ऐरोली-काटई नाका प्रकल्पाच्या पहिल्या भागातील शेवटच्या पीएससी आय गर्डरच्या उभारणीसह या भागातील सर्व गर्डरचे लॉन्चिंग पूर्ण केले आहे. ठाणे बेलापूर रोडवर भारत बिजली जंक्शन ऐरोली येथील एकूण १६ पीएससी आय गर्डर लॉन्च करण्यात आले. हे गर्डर २३ ते २८ मीटर लांबीचे असून प्रत्येक गर्डरचे वजन जवळपास ४८ मेट्रिक टन इतके आहे. सुमारे २५० मेट्रिक टन क्षमतेच्या दोन क्रेनच्या साहाय्याने हे गर्डर लाँच करण्यात आले आहेत. सदर काम पूर्ण करण्यासाठी दोन ट्रॅफिक ब्लॉक घेण्यात आले. पहिला ब्लॉक २५ आणि २६ मार्च आणि दुसरा ब्लॉक २९ आणि ३०मार्च दरम्यान रात्री १०:३० ते सकाळी ६:०० या कालावधीत घेण्यात आला.

एमएमआरडीए कल्याण-डोंबिवली आणि नवी मुंबई दरम्यान अखंड तसेच वाहतूक सुलभ करण्याच्या दृष्टीने १२.३ किलोमीटरचा ऐरोली-कटाई नाका रस्ता प्रकल्प बांधत आहे. ऐरोली-काटई नाका प्रकल्प मुलुंड-ऐरोली पुलापासून सुरू होऊन ठाणे-बेलापूर मार्गे आणि राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 4 वरून कल्याण-शीळ रस्त्यावरील काटई नाक्यापर्यंत विस्तारला आहे. या प्रकल्पामुळे वाहनांसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध होईल आणि सुलभता मिळेल तसेच कल्याण डोंबिवली आणि नवी मुंबई या दोन्ही भागात वाहतूक कोंडी कमी होईल.

१२.३ किमी लांबीचा हा प्रकल्प तीन भागांत विभागलेला आहे. पहिल्या भागात ठाणे-बेलापूर रस्ता आणि राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ (जुना मुंबई पुणे महामार्ग) दरम्यान ३.४३ किमी लांबीच्या रस्त्याच्या बांधकामाचा समावेश आहे. पहिल्या भागात ३+३ मार्गिकांसह १+१ रेफ्युज मर्गिकेचा १.६९ किमी लांबीचा दुहेरी बोगदा असून उर्वरित रस्ता उन्नत आणि सामान्य रस्ता असेल. या भागातीलतील उन्नत मर्गिकेचे काम ९२ टक्के पूर्ण झाले आहे तसेच बोगद्याचे ६६ टक्के काम पूर्ण झाले आहे. दुस-या भागात २.५७ किमीचा संपूर्ण उन्नत रस्ता असेल जो मुलुंड-ऐरोली पुलाला ठाणे-बेलापूर रोडला जोडेल. या भागातील सुमारे ६७.५टक्के काम पूर्ण झाले आहे. प्रकल्पाच्या तिसऱ्या भागात कल्याण-शीळ रोड येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ ते काटई नाका यांना जोडणारा ६.३० किमीचा पूर्ण उन्नतमार्ग असणार आहे.

**"एमएमआरडीएच्या टीमने ऐरोली-काटई नाका प्रकल्पात पहिल्या भागातील ऐरोली बाजूचा शेवटचा पिएससी आय गर्डर लॉन्च करून महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. त्यामुळे आता प्रकल्पातील पहिला भाग हा दुसऱ्या भगासोबत जोडला जाईल. प्रकल्पाच्या पहिला भागा पूर्णत्वाच्या मार्गावर असून डेक स्लॅब, एसीबी, कोटिंग करणे, पेंटिंगची कामे प्रगतीपथावर आहेत."** असे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त श्री एस.व्ही.आर. श्रीनिवास, भा. प्र.से., यांनी सांगितले.







